ऐकून रामभाऊ म्हणाले, 'असे होते तर ऑब्जेक्शन कशाला घेतलं होतंत ?' ते ऐकून गदिमा एकदम गडबडले व रामभाऊंना म्हणाले, 'काहीतरीच बोलू नकोस. त्यांचा माझ्याविषयी गैरसमज व्हायचा.' मी म्हटलं, 'समज जो व्हायचाय तो झालेलाच आहे. तरी पण एक आहे- तुम्ही ऐकावे ही माझी इच्छा आहे.' रामभाऊ म्हणाले, 'ठीक आहे, आजच गाणी ऐकवून टाका.' मी म्हटले, 'ठीक आहे. मी पुढे होतो. तुम्ही तुमचे आटोपून घरी या.' ते ऐकून गदिमा म्हणाले, 'तुमच्या घरी नको. आपण बाबूजींकडे (सुधीर फडके) ती ऐकूया.' गदिमांनी माझ्यावर प्रेशर यावे म्हणून तसे केले असावे. रामभाऊ म्हणाले, 'खळे, तुम्हाला काही हरकत आहे का ?' मी सांगितले, 'अजिबात नाही.' तेव्हा रामभाऊ म्हणाले, 'बाबूजींकडे जाताच आहात, तर ते दोन अभंग जे केलेले आहेत, ते त्यांच्याबरोबर बसवून घ्या.'

अगदी खरे सांगायचे म्हणजे तोपर्यंत माझी व फडकेंची व्यक्तिशः ओळख नव्हती. तरीही मी त्यांच्या घरी गेलो. बाबूजींनी विचारले, 'काय काम आहे ?' तेव्हा मी त्यांना सांगितले की, 'रामभाऊंनी मला तुमच्याकडून दोन अभंग बसवून घ्यावयास सांगितले आहेत.' ते म्हणाले, 'चला- लागूया कामाला.' एक अभंग बसवायला घेतला. साधारण एक-दीड तास काम चालले. मग त्यांना विचारले, 'दुसरा बसवायला घ्यायचा का ?' ते म्हणाले, 'अहो, अगोदर हा तरी नीट बसू दे. मग दुसऱ्याचा विचार करू. तुमचे काम वेगळे आहे. लयीला तुम्ही फार मुश्कील केलंयत.' मी म्हटले, 'मला जे करता येते ते मी केले.' मग मी त्यांना म्हणालो, 'ठीक आहे. दुसऱ्या अभंगासाठी आपण नंतर बसू. आता मी निघतो.' मी उठल्यावर ते म्हणाले, 'खळे, रामभाऊ सांगत होते की, तुम्ही आशासाठी केलेल्या चाली अप्रतिम आहेत. तुमची हरकत नसेल तर तुम्ही मला त्या ऐकवाल काय ?' मी म्हणालो, 'जरूर.' खाली बसून पेटीवर त्यांना 'एका तळ्यात' व 'गोरी गोरीपान' या गीतांच्या चाली ऐकविल्या. ती गाणी ऐकल्यावर ते म्हणाले, 'बऱ्याच काळानंतर वेगळ्या प्रकारचे संगीत ऐकल्याचे समाधान वाटले.' हे सगळे होईपर्यंत रामभाऊ व गदिमा येऊन हजर झाले. त्यांना तेथे आलेले बघून बाबूजींना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, 'आज तुम्ही दोघे इथे कसे ?' यावर अण्णा म्हणाले, 'खळेंनी तुम्हाला सांगितले नाही ? आम्ही येथे त्यांची गाणी ऐकण्यासाठी आलो आहोत ?' ते ऐकून बाबूजी म्हणाले, 'काय ऐकताय गाणी ! यांनी गाणी इतकी अप्रतिम केलीयत ! आहाहा !' ते ऐकून अण्णा म्हणाले, 'नक्कीच या माणसाकडे काहीतरी जादू आहे रे बाबा. आता हे बाबूजीदेखील याचे गुणगान करू लागलेत. आता याची गाणी ऐकलीच पाहिजेत.' ज्यावेळी मी त्यांना गाणी ऐकविली तेव्हा ते एकदम उठले व मला घट्ट मिठी मारली.